77
3

D:\Bilaye 24.06.2016\77 order.docx

# सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, उरण


यांचे कार्यालय

बापदेव मंदिराशेजारी, उरण बोरी, ता. उरण जि. रायगड

फोन नं. 02227220345 ईमेल - arcsuranraigad@gmail.com


२७८ जा.क्र. सनिउ/सअर/क७७अ/श्री हरिकृपा हौ/सन१८

दिनांक- ०१/०१/२०१८.

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये आदेश.

वाचावे :- १. श्री हरिकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. उरण ता. उरण जि. रायगड या संस्थेच्या सभासदांनी दिनांक ०४/१०/२०१७ अन्वये संस्थेची कार्यकारणी अस्तित्वात नसलेबाबत दाखल केलेली तक्रार.

२. या कार्यालयाचे जा.क्र. सम दिनांक २४/११/२०१७ अन्वये कलम ७७ (अ) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस.

३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतुद.

ज्याअर्थी, श्री हरिकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. उरण ता. उरण जि. रायगड ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था असून ती या कार्यालयाच्या अधिकारक्षेत्रात येते आणि,

ज्याअर्थी श्री. आर. आर. बिलये, प्राधिकृत अधिकारी यांनी सन २०१७-१८ ते २०२१-२२ या कालावधीसाठी व्यवस्थापक समितीची निवडणूक घेणसाठी संस्थेकडे वारंवार भेट देवूनही संस्थेकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचे त्यांचे अहवालात नमुद केले आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे सभासद श्री. समीर शेख व इतर यांनी या कार्यालयाकडे वाचावे क्र. १ अन्वये या कार्यालयास संस्थेची कार्यकारीणी मंडळ अस्त्वात नसल्याचे व उपविधी नुसार काम चालविले जात नसल्याची तक्रार दाखल केली. सदर तक्रारीचे अनुषंगाने या कार्यालयाने दि. ०६/१०/२०१७ च्या पत्रान्वये संस्थेस पत्र देवूनही संस्थेने त्यावर कोणतेही उत्तर दिलेले नाही. आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये वाचावे क्र. २ अन्वये संस्थेस कारणे दाखवा नोटीस दिलेली असून सदर नोटीसी अन्वये संस्थेस म्हणणे मांडणेसाठी संधी दिलेली होती. परंतु संस्थेच्या वतीने सदर सुनावणीस दि. १२/१२/२०१७ रोजी कोणीही पदाधिकारी उपस्थित राहीले नाहीत अथवा त्यांचा लेखी खुलासा/म्हणणे सादर केलेले नाही. आणि,

ज्याअर्थी, संस्था चालविण्यांस कुठल्याही सदस्याना स्वारस्य राहीलेले नसल्याने संस्थेवर अधिकृत व्यवस्थापक समितीच अस्तित्वात राहीलेली नाही. सबब संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी तात्काळ प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक असल्याचे माझे मत झाले आहे. आणि,

Assistant Registrar, Co-operative Societies, URAN-RAIGAD

...२..

29/1/2018

D:\Bilaye 24.06.2016\77 order.docx



त्याअर्थी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :- आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये मला प्राप्त् अधिकारापरत्वे मी. संदिप ठाकूर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, उरण तालुका जि. रायगड श्री हरिकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. उरण ता. उरण जि. रायगड या संस्थेची विद्यमान व्यवस्थापक समिती बरखास्त् करुन श्री. आर. आर. बिलये, सहकारी अधिकारी श्रेणी २ यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. त्यांनी संस्थेच्या दप्तराचा मालमत्तेचा व कागदपत्रांचा संपुर्ण पदभार घेऊन अहवाल या कार्यालयांस सादर करावा. तसेच दोषांची पुर्तता करुन सहा महिन्याचे आंत नवीन व्यवस्थापक समिती गठीत करुन पदभार सुपुर्त करावा.

सदरचा आदेश आज दिनांक ०१/०१/२०१८ रोजी माझे सही शासन मुद्रेसह दिला आहे.

(संदिप ठाकूर)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, उरण तालुका

१) चेअरमन/सेक्रेटरी/खजिनदार/सदस्य
श्री हरिकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. उरण ता. उरण जि. रायगड

२/- त्यांना कळविण्यांत येते की, त्यांनी संस्थेच्या दप्तराचा मालमत्तेचा आणि हिशोबाचा ताबा प्राधिकृत अधिकारी यांचेकडे सुपुर्द करावा. तसेच प्राधिकृत अधिकारी यांना मानधन रु. ५०००/- व प्रवास खर्च रु. १०००/- असे एकुण दरमहा रु. ६०००/- मात्र प्राधिकृत अधिकारी मेहनताना म्हणून मंजूर करण्यांत येत आहे. सदरचा खर्च संस्थेच्या निधीतुन भागविण्यांत यावा.

२) श्री. आर. आर. बिलये, सहकारी अधिकारी श्रेणी-२

२/- त्यांना कळविण्यांत येते की, त्यांनी संस्थेच्या दप्तराचा मालमत्तेचा आणि हिशोबाचा ताबा त्वरीत घेऊन अहवाल या कार्यालयांस सादर करावा.

३) शाखा व्यवस्थापक, दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. उरण शाखा

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, उरण तालुका